मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 07 ऑगस्ट 2026 | पान- 1

# मोशीवरील कचऱ्याचा ताण आता कमी करा; शहरात किमान 10 पर्यायी कचरा प्रक्रिया केंद्रे उभारावीत

## नगरसेवक तथा ‘क’ प्रभाग सभापती निखिल बोऱ्हाडे यांची आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी येथील कचरा डेपो दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर शहराच्या कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मोशी परिसरावर गेल्या अनेक वर्षांपासून पडणारा कचऱ्याचा एकतर्फी ताण कमी करून शहरातील विविध भागांमध्ये विकेंद्रित पद्धतीने कचरा प्रक्रिया केंद्रे उभारावीत, अशी मागणी प्रभाग क्रमांक २ मोशी येथील नगरसेवक तथा ‘क’ प्रभाग सभापती निखिल बोऱ्हाडे यांनी केली आहे.

याबाबत बोऱ्हाडे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना पत्र देऊन कचरा व्यवस्थापनासाठी दीर्घकालीन आणि शाश्वत नियोजन करण्याची मागणी केली आहे.

मोशी येथे घडलेल्या दुर्घटनेनंतर परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा आणि आरोग्याचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीरपणे समोर आला आहे. शहराच्या विकासासाठी मोशीकरांनी आजवर सातत्याने सहकार्य केले आहे. मात्र, वर्षानुवर्षे शहरातील मोठ्या प्रमाणावरील कचरा मोशी परिसरात आणून टाकला जात असल्याने येथील नागरिकांना त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागत आहेत, असे बोऱ्हाडे यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

मोशी परिसरात मोठ्या प्रमाणावर साचणाऱ्या कचऱ्यामुळे दुर्गंधी, वायू प्रदूषण, भूजल व पाण्याचे प्रदूषण, तसेच कचऱ्यातून निर्माण होणाऱ्या लिचेटमुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणावर हानी होत आहे. या सर्वांचा थेट परिणाम परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर होत असून भविष्यात त्याचे अधिक गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे, अशी भूमिका निखिल बोऱ्हाडे यांनी मांडली आहे.



### शहरात किमान १० ठिकाणी कचरा प्रक्रिया केंद्रे उभारण्याची मागणी

**» कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न केवळ मोशीपुरता मर्यादित न ठेवता संपूर्ण शहरासाठी विकेंद्रित स्वरूपाचे नियोजन करण्यात यावे, अशी ठोस मागणी निखिल बोऱ्हाडे यांनी केली आहे. शहरातील लोकसंख्या, प्रभागनिहाय कचऱ्याचे प्रमाण आणि भविष्यातील वाढ लक्षात घेऊन किमान १० ठिकाणी पुढील १० वर्षांची गरज लक्षात घेऊन कचरा प्रक्रिया व विल्हेवाटीसाठी जागा निश्चित कराव्यात. या जागा अधिकृतपणे निश्चित करून त्याबाबत स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली आहे.**

### दररोज 1,500 टन कचरा; प्रक्रिया क्षमतेपेक्षा 800 टन अधिक

**» मोशी येथील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाची प्रक्रिया क्षमता सुमारे ७०० टन प्रतिदिन आहे. दुसरीकडे शहरातून दररोज सुमारे १,५०० टन कचरा निर्माण होत असल्याने प्रक्रिया क्षमतेपेक्षा सुमारे ८०० टन अतिरिक्त कचऱ्याचे डम्पिंग करण्याची वेळ येत आहे. भविष्यात पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या वाढत असताना कचऱ्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता आहे. आगामी काळात दररोज २,००० ते २,५०० टन कचरा निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, आत्तापासूनच दीर्घकालीन नियोजन करणे गरजेचे असल्याचे निखिल बोऱ्हाडे यांनी स्पष्ट केले.**

### ‘मोशीवर अतिरिक्त कचरा टाकू देणार नाही’

**» दरम्यान, पर्यायी कचरा प्रक्रिया केंद्रांबाबत तातडीने निर्णय घेऊन कार्यवाही न झाल्यास मोशी परिसरात दररोज होणारे ७०० टनांपेक्षा अधिक कचऱ्याचे डम्पिंग तसेच भविष्यात वाढणारा अतिरिक्त कचरा मोशी येथे टाकू देणार नाही, असा स्पष्ट इशारा नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी दिला आहे. या मागणीबाबत उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस महानगरपालिका प्रशासन जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी, असेही त्यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे.**

# चिखलीतील राजगड व माऊली सोसायटीत एलटी केबल बदलण्याचे काम सुरू

## 3500 नागरिकांना मिळणार दिलासा, राजगड आणि माऊली सोसायटी परिसरातील वीज वितरण व्यवस्थेचा प्रश्न अखेर मार्गी लागला

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली प्रभाग क्रमांक १ मधील राजगड आणि माऊली सोसायटी परिसरातील वीज वितरण व्यवस्थेचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून आजपासून या भागात नवीन एलटी केबल (LT CABLE) बसवण्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. या भागातील जुनी व जीर्ण झालेली केबल वारंवार खराब होत असल्यामुळे वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा आणि सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. या समस्येमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांच्या सुविधेसाठी आणि संभाव्य अपघात टाळण्यासाठी स्थानिक पातळीवरून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. याबाबत महावितरणकडे दाद मागितल्यानंतर त्यांनी केबल बदलण्याचे अंदाजपत्रक तयार केले होते.

या कामासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध व्हावा यासाठी राज्याचे विधानसभा उपाध्यक्ष तथा पिंपरी विधानसभेचे आमदार अण्णासाहेब बनसोडे यांची भेट घेऊन त्यांना परिस्थितीची गांभीर्याने नगरसेवक यश साने यांनी कल्पना दिली होती. आमदार स्थानिक विकास निधीतून या कामासाठी निधी मंजूर करण्याची विनंती करण्यात आली होती. या पाठपुराव्याला यश आले असून प्रशासनाकडून तातडीने हालचाली करत आजपासून राजगड व माऊली सोसायटीमध्ये नवीन एलटी केबल टाकण्याचे काम प्रत्यक्ष सुरू करण्यात आले आहे. या कामामुळे या परिसरातील सुमारे ३५०० हून अधिक नागरिकांना अखंडित व सुरक्षित वीजपुरवठा मिळून त्यांचा वर्षानुवर्षांचा प्रश्न कायमचा सुटणार आहे. काम सुरू असताना नागरिकांनी योग्य ते सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.



**“ आमच्या प्रभागातील राजगड आणि माऊली सोसायटी परिसरातील एलटी केबल अत्यंत जीर्ण झाल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. विधानसभा उपाध्यक्ष तथा आमदार अण्णासाहेब बनसोडे यांची भेट घेऊन हा प्रश्न त्यांच्या निदर्शनास आणून दिला होता. त्यांच्या सहकार्यामुळे आज हे काम प्रत्यक्ष सुरू होत असून परिसरातील सुमारे ३५०० नागरिकांना याचा मोठा फायदा होणार आहे. काम व्यवस्थित पार पडण्यासाठी सर्व रहिवाशांनी सहकार्य करावे. अशी विनंती आहे.**

**- यश साने ,नगरसेवक, सदस्य - शिक्षण समिती, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

# चिखली, मोशी, तळवडे यांसह समाविष्ट गावांचा वीज प्रश्न कधी सुटणार?

## अघोषित वीजभारनियमन, खंडित वीजपुरवठा आणि तांत्रिक बिघामांमुळे स्थानिक नागरिक, व्यावसायिक आणि शेतकरी त्रस्त झाले आहेत.



**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली, मोशी, तळवडे तसेच पिंपरी चिंचवड महापालिकेत समाविष्ट झालेल्या विविध गावांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने वीज खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. अघोषित वीजभारनियमन, खंडित वीजपुरवठा आणि तांत्रिक बिघामांमुळे स्थानिक नागरिक, व्यावसायिक आणि शेतकरी त्रस्त झाले आहेत.

भोसरी, मोशी, चिखली, चऱ्होली, चऱ्होली बुद्रुक, दिघी, तळवडे, बोऱ्हाडेवाडी, डुडुळगाव, जाधववाडी ,कुदळवाडी या भागाचे वीज पुरवठ्याचे काम भोसरी विभागांतर्गत येते. मात्र गेल्या काही दिवसांपासून या भागात वारंवार खंडित होणाऱ्या विजेमुळे नागरिक त्रस्त आहेत. त्यांच्या दैनंदिन जीवनावरही परिणाम झाला असून या गंभीर समस्येकडे महावितरण प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी देखील आक्रमक भूमिका घेतली आहे.

यासाठी पत्रव्यवहार करून महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले जात आहे. तसेच महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष बैठका घेऊन वीज पुरवठ्यात तत्काळ सुधारणा करण्याची मागणी देखील केली जात आहे. या परिसरातील नागरिकांना अखंडित वीज मिळण्यासाठी लोकप्रतिनिधींकडून पाठपुरावा सुरू असून महावितरणकडून लवकरात लवकर ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे. दरम्यान, भोसरी विभागासाठी प्रस्तावित असलेला डीपीआर आणि त्याअंतर्गत होणारी कामे पूर्ण झाल्यानंतरच या भागातील विजेचा वनवास संपणार असल्याचे चित्र आहे.

> "चिखली, मोशी, चऱ्होलीसह समाविष्ट गावांमध्ये विजेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. नागरिक आणि व्यावसायिकांना रोजच वीज खंडित होण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. यासंदर्भात मी विधानसभेचे उपाध्यक्ष आमदार अण्णा बनसोडे यांच्याकडे दाद मागितली असून महावितरणच्या अधिकाऱ्यांशीही वारंवार पत्रव्यवहार करत आहे. प्रत्यक्ष बैठका घेऊन अधिकाऱ्यांना तातडीने सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांना सुरळीत वीज मिळेपर्यंत आमचा हा पाठपुरावा असाच सुरू राहील.
>
> **- यश साने ,नगरसेवक**

> समाविष्ट गावांमधील वाढत्या नागरीकरणामुळे विजेची मागणी वाढली आहे, मात्र महावितरणच्या तोकड्या पायाभूत सुविधांमुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सातत्याने वीज जाण्यामुळे गृहिणी, विद्यार्थी आणि व्यापारी सर्वच हवालदिल झाले आहेत. महावितरणने कोणतीही टोलवाटोलवी न करता या भागातील वीज समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात आणि नागरिकांना दिलासा द्यावा.
>
> **- संगीता ताम्हाणे,नगरसेविका**

> "भोसरीचा डीपीआर मध्ये या संदर्भातील सर्व कामे प्रस्तावित आहेत. याबाबत निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. भोसरी विभागातील १० उपकेंद्रांची उभारणी या माध्यमातून होणारा असून या परिसरातील ९० टक्के वीज समस्येचा प्रश्न मार्गी लागेल, अशी खात्री आहे."
>
> **- विश्वनाथ लहाने, कार्यकारी अभियंता, महावितरण**

# अन्न सुरक्षेचा फज्जा! चिखली मोशीत व्यावसायिकांकडून अन्न सुरक्षेचे नियम धाब्यावर

## अन्न प्रशासनाचे मोठ्या हॉटेलसह खानावळी, पथविक्रेत्यांकडे दुर्लक्ष



**पिंपरी | प्रतिनिधी**

नुकत्याच निगडी येथील एका नामांकित हॉटेलमध्ये ग्राहकाला पावभाजीमध्ये आळी आढळल्याची धक्कादायक घटना घडली. एका बाजूला नामांकित आणि मोठ्या हॉटेल-रेस्टॉरंट्समध्ये जर असा निष्काळजीपणा अन् अस्वच्छता पाहायला मिळत असेल, तर दुसरीकडे गल्लीबोळात आणि मुख्य चौकांमध्ये फोफावलेल्या हातगाड्यांवरील खाद्यपदार्थांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. चिखली आणि मोशी परिसरात कोणत्याही परवान्याशिवाय, उघड्यावर आणि अस्वच्छ वातावरणात अन्नपदार्थांची विक्री करणाऱ्या पथविक्रेत्यांचे प्रमाण प्रचंड वाढले असून, यावर अन्न व औषध प्रशासनाचा (FDA) ठोस अंकुश नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

परिसरातील खानावळी, स्वीट मार्ट आणि टपऱ्यांवर अस्वच्छता असते. शिळे मसाले, निकृष्ट दर्जाचे तेल आणि अस्वच्छ पाण्याचा वापर सर्रास केला जातो. स्वयंपाकघरात पुरेशी स्वच्छता न राखता तिथे बिनधास्तपणे खाद्यपदार्थ तयार केले जातात. या गंभीर प्रकारामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, प्रशासकीय यंत्रणा मात्र केवळ तक्रार आल्यावरच कारवाईचा दिखावा करते का, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

अन्नपदार्थांविषयी काही तक्रार असल्यास नागरिकांना १८००२२२३६५ या टोल-फ्री क्रमांकावर किंवा COMPLAINTS.MAHAFDA.IN या संकेतस्थळावर संपर्क साधण्याचे आवाहन केले जात असले, तरी प्रत्यक्षात प्रशासनाची स्वतःहून धडक कारवाई होणे आवश्यक आहे. चिखली-मोशीसारख्या वेगाने वाढणाऱ्या भागात अन्न निरीक्षक फिरकतही नसल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांकडून होत असून, अशा बेकायदेशीर आणि अस्वच्छ गाड्यांवर कारवाई कधी होणार, असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे.

> "आमच्या विभागाकडून रुटीन तपासणी आणि अन्न नमुने घेण्याची कारवाई नियमितपणे सुरू असते. प्रत्येक अन्न निरीक्षकाला दरमहा तपासण्या बंधनकारक करण्यात आल्या आहेत. सध्या प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे प्रमाण जास्त असल्याने प्राधान्याने त्या तक्रारींवर तातडीने कारवाई केली जाते. याशिवाय हॉटेल, खानावळी आणि हातगाड्यांवरील अनधिकृत विक्रीविरोधात विशेष मोहिमा राबवण्याचे आमचे नियोजन आहे. चिखली-मोशी परिसरातही लवकरच विशेष पाहणी दौरा आयोजित केला जाईल."
>
> **- दिगंबर भोगावडे,उप आयुक्त, अन्न प्रशासन विभाग**

# निविदांवर राजकीय दबाव; महापालिकेतील शेकडो कोटींची विकासकामे रखडली

## ठेकेदारांच्या शिफारशींसाठी पदाधिकारी, नगरसेवक आणि नेत्यांची धावपळ; दोन महिन्यांपासून अनेक निविदांची पाकिटे न उघडल्याने प्रशासन अडचणीत

**पुणे | प्रतिनिधी**

तब्बल चार वर्षांचा प्रशासकीय कालावधी संपुष्टात आल्यानंतर आता विकासकामे आपल्या पदरात पाडून घेण्यासाठी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांमध्ये चढाओढ सुरू झाली आहे. संबंधित कामे ठराविक ठेकेदारांनाच मिळण्यासाठी महापालिका प्रशासनावर प्रचंड दबाव टाकला जात असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे मागील दोन महिन्यांपासून शेकडो कोटी रुपयांच्या अनेक निविदा पाकीटबंद ठेवल्याने प्रशासनाची चांगलीच कोंडी झाली आहे.

या निविदांबाबत केवळ स्थानिक पदाधिकारी किंवा नगरसेवकच नव्हे, तर आमदारांसह राज्यातील अनेक बड्या राजकीय नेत्यांकडूनही प्रशासनावर दबाव आणला जात असल्याची चर्चा महापालिका वर्तुळात आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकारीही दबावाखाली काम करत असल्याचे चित्र आहे. जानेवारी २०२६ मध्ये नवीन सभागृह अस्तित्वात आल्यानंतर विविध विषय समित्यांची स्थापना करण्यात आली. २०२६-२७ च्या अंदाजपत्रकानुसार महापालिकेने विकासकामांच्या निविदा काढल्या आहेत.

त्यामध्ये नवीन रस्ते, उड्डाण पूल, विद्युत विभागाची देखभाल-दुरुस्ती, रस्त्यांचे रिसर्फेसिंग, खड्डे दुरुस्ती, नवीन ड्रेनेज आणि पावसाळी वाहिन्यांची कामे अशा विविध प्रकल्पांचा समावेश आहे. या कामांची निविदा प्रक्रिया प्रशासनाने मे महिन्यातच पूर्ण केली होती. मात्र, आता तांत्रिक पात्रता आणि दरपत्रकाची पाकिटे उघडण्यापूर्वी आपल्या पसंतीचा ठेकेदार पात्र ठरावा, यासाठी पदाधिकाऱ्यांकडून प्रशासनावर मोठ्या प्रमाणात दबाव टाकला जात आहे.

कागदपत्रांच्या छाननीदरम्यान संबंधित ठेकेदार अपात्र ठरू नये, यासाठी काही पदाधिकारी थेट ठेकेदारांना सोबत घेऊन विभागप्रमुख, अतिरिक्त आयुक्त आणि आयुक्तांच्या भेटी घेत असल्याची माहिती आहे. दुसरीकडे नगरसेवकांकडूनही पदाधिकाऱ्यांवर विशिष्ट कामे मिळवून देण्यासाठी आग्रह धरला जात आहे. एकाच कामासाठी विविध पदाधिकाऱ्यांकडून वेगवेगळ्या ठेकेदारांची शिफारस केली जात असल्याने प्रशासनाची अडचण वाढली आहे.



### वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही दबावाची कबुली

» महापालिकेच्या एका अतिवरिष्ठ अधिकाऱ्यानेच निविदा प्रक्रियेवर राजकीय दबाव असल्याची कबुली दिल्याची चर्चा आहे. स्थानिक पदाधिकारी, नगरसेवक, आमदार तसेच राज्यातील बड्या नेत्यांकडूनही विविध कामांसाठी शिफारशी येत असल्याने अधिकारी दबावाखाली काम करत आहेत. काही निविदा उघडूनही त्या अद्याप आयुक्त किंवा स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे शहरातील विकासकामांचा वेग मंदावला असून निर्णय प्रक्रियेवर राजकीय हस्तक्षेप वाढल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

### निविदा रखडल्याने विकासकामांवर ब्रेक

» महापालिकेच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पातील रस्ते, उड्डाण पूल, ड्रेनेज, पावसाळी वाहिन्या, रस्ते दुरुस्ती आणि विद्युत विभागाशी संबंधित शेकडो कोटी रुपयांच्या विकासकामांच्या निविदा मे महिन्यातच पूर्ण झाल्या होत्या. मात्र, ठेकेदारांच्या निवडीवर सुरू असलेल्या राजकीय दबावामुळे अनेक निविदांची पाकिटे अद्याप उघडण्यात आलेली नाहीत. परिणामी, शहरातील महत्त्वाची विकासकामे रखडली असून नागरिकांनाही त्याचा फटका बसत आहे. प्रशासनाने निविदा प्रक्रिया पूर्ण केली असली तरी अंतिम निर्णय लांबल्याने प्रकल्पांच्या अंमलबजावणीत मोठा विलंब होत आहे.

### ठेकेदारांसाठी पदाधिकाऱ्यांची लॉबिंग

» विशिष्ट ठेकेदारांना कामे मिळावीत, यासाठी काही पदाधिकारी संबंधित ठेकेदारांना सोबत घेऊन विभागप्रमुख, अतिरिक्त आयुक्त आणि आयुक्तांच्या भेटी घेत असल्याची माहिती आहे. तांत्रिक छाननीत ठेकेदार अपात्र ठरू नयेत, यासाठीही प्रयत्न सुरू असल्याची चर्चा महापालिका वर्तुळात आहे. एकाच कामासाठी विविध राजकीय नेत्यांकडून वेगवेगळ्या ठेकेदारांची शिफारस होत असल्याने प्रशासनाची कोंडी वाढली आहे. त्यामुळे निर्णय प्रक्रियेवर दबाव निर्माण होऊन पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# वाहतूक कोंडीवरून महापौर कडाडल्या! पोलिसांना 15 दिवसांत सर्व्हे अहवाल सादर करण्याचे आदेश

## सिंहगड रस्ता क्षेत्रीय कार्यालयात लोकप्रतिनिधी अन् पोलिसांची महत्त्वाची बैठक; धायरी, नऱ्हे, नांदेड सिटी परिसरातील कोंडीवर उपाययोजनांची मागणी.

**पुणे | प्रतिनिधी**

सिंहगड रस्त्यावरील वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर महापौर मंजूषा नागपुरे यांनी पोलीस प्रशासनाला धारेवर धरत धायरी, नऱ्हे, नांदेड सिटी, वडगाव तसेच दांडेकर पुलापर्यंतच्या मुख्य व पर्यायी रस्ते तसेच चौकांचे १५ दिवसांच्या आत सर्वेक्षण करून अहवाल महापालिकेला सादर करण्याचे निर्देश दिले. अहवालानुसार वाहतूक वॉर्डनची नियुक्ती, आवश्यक उपाययोजना आणि कोंडी कमी करण्यासाठी अंमलबजावणी करण्यात येईल.

तोपर्यंत मुख्य रस्त्यांवर वाहतूक पोलीस, वॉर्डनची संख्या वाढविण्याचे आदेशही त्यांनी दिले. सिंहगड रस्ता क्षेत्रीय कार्यालयात झालेल्या बैठकीस प्रभाग समिती अध्यक्ष सचिन मोरे, सहाय्यक पोलिस आयुक्त वसंत कुवंर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गौड, पोलीस निरीक्षक सुनील गवळी, सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रियंका गोरे, सचिन पाटील, राष्ट्रवादीचे गटनेते काका चव्हाण, माजी उपमहापौर प्रसन्न जगताप तसेच परिसरातील नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होत्या.

यावेळी लोकप्रतिनिधींनी धायरीतील उंबऱ्या गणपती चौकापासून दांडेकर पुलापर्यंत



सकाळ-सायंकाळी होणाऱ्या वाहतूक कोंडीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. अनेक ठिकाणी वाहतूक पोलीस अनुपस्थित असल्याने विद्यार्थी, नोकरदार आणि रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विरुद्ध दिशेने होणारी वाहतूक, अनधिकृत पार्किंग आणि अतिक्रमणांमुळे कोंडीत भर पडत असून, वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याची खंत व्यक्त केली.

संतापलेल्या महापौरांनी कोंडीच्या वेळी पोलीस रस्त्यावर दिसत नाहीत, असणारे कर्मचारी वाहतूक सुरळीत करण्याऐवजी दंडात्मक कारवाईत व्यस्त असतात असे नमूद केले. रस्त्यांवर कार्यक्रम, मिरवणूकीसाठी परवानगी देताना वाहतूक आणि ध्वनीप्रदूषणाचा पुरेसा विचार केला जात नसल्याने नागरिकांचा रोष लोकप्रतिनिधींना सहन करावा लागतो. पोलिसांची काहीच जबाबदारी आहे की नाही,

> “महापालिका वाहतूक पोलिसांना सर्वतोपरी सहकार्य करण्यास तयार असून, सर्वेक्षण अहवालानुसार आवश्यक ती सर्व कामे तातडीने करण्यात येतील. मात्र, तोपर्यंत तातडीनं प्रत्येक चौकात पोलीस, वार्डन नेमावे.”
>
> - मंजुषा नागपुरे ( महापौर, पुणे महापालिका.)

# हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोच्या उद्घाटनाचा मुहूर्त अखेर ठरला

## पुण्यातील लाखो आयटी कर्मचाऱ्यांसाठी आणि नागरिकांसाठी मोठी खुशखबर समोर आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणेकरांसह लाखो आयटी कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी असून हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो सेवा आता सुरू होणार आहे. या मार्गावरील सेवेला मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी मंजुरी दिल्याने सेवा सुरू होण्याचा मार्ग खुला झाला होता. त्यानंतर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) या मेट्रो मार्गाचे उद्घाटन करण्यासाठी राज्य सरकारला पत्र लिहिले आहे. राज्य सरकारकडून उद्घाटनाचा अधिकृत मुहूर्त लवकरच जाहीर केला जाण्याची शक्यता असून १५ ऑगस्टला उद्घाटन होण्याची शक्यता आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

हिंजवडी आयटी पार्कला पुण्याच्या मध्यवर्ती भागाशी जोडणाऱ्या पुणेरी मेट्रोची सेवा सुरु होण्याची प्रतीक्षा पुणेकरांसह लाखो आयटी कर्मचाऱ्यांना आहे. नागरी विमान वाहतूक मंत्रालयांतर्गत कार्यरत मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी (सीएमआरएस) माण स्थानक ते आर. के. लक्ष्मण संग्रहालय (बालेवाडी) या १२ स्थानकांदरम्यानच्या टप्प्यावर प्रवासी वाहतूक सुरू करण्यास गेल्या महिन्यात मंजुरी दिली. त्यानंतर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने राज्य सरकारला पत्र लिहिले आहे. यात मेट्रोच्या उद्घाटनाची तारीख निश्चित करण्याची विनंती करण्यात आली आहे. राज्य सरकारकडून लवकरच उद्घाटनाचा मुहूर्त जाहीर केला जाणार आहे. दरम्यान सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ ऑगस्टला उद्घाटन करण्याचे नियोजन केले जात आहे.

हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो दोन टप्प्यात सुरू होणार आहे. पहिला टप्पा मान ते बालेवाडी आणि दुसरा टप्पा बाणेर हायस्ट्रीट ते शिवाजीनगर असा असेल. माण ते बालेवाडी १२ स्थानकांदरम्यानच्या सेवेला मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी २३ जुलैला तात्पुरते प्राधिकरण प्रदान केले आहे. या मंजुरीमुळे सीबीटीसी सिग्नलिंग प्रणालीअंतर्गत एटीपी मोडवर मेट्रो ताशी ८० किलोमीटर या कमाल वेगाने धावू शकणार आहे. सर्व वैधानिक तपासण्या, चाचण्या आणि सुरक्षा मानकांची पूर्तता झाल्यानंतरच ही मंजुरी देण्यात आली आहे. सुमारे १३ किलोमीटर लांबीचा हा दुहेरी मार्ग ७५० व्होल्ट डीसी थर्ड रेल ट्रॅक्शन प्रणालीवर कार्यरत राहणार आहे.



### लवकरच निर्णय अपेक्षित

**» हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गावरील सेवा सुरू करण्याबाबत राज्य सरकारला पत्र लिहिले आहे. राज्य सरकारकडून उद्घाटनाची तारीख निश्चित केली जात आहे. ही तारीख निश्चित होऊन लवकरच या मार्गावरील सेवा सुरू होईल, अशी माहिती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिली.**

### पहिला टप्पा सुरु होणार

**» हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो दोन टप्प्यात सुरू होणार आहे. पहिला टप्पा मान ते बालेवाडी आणि दुसरा टप्पा बाणेर हायस्ट्रीट ते शिवाजीनगर असा असेल. माण ते बालेवाडी १२ स्थानकांदरम्यानच्या सेवेला मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी २३ जुलैला तात्पुरते प्राधिकरण प्रदान केले आहे. या मंजुरीमुळे सीबीटीसी सिग्नलिंग प्रणालीअंतर्गत एटीपी मोडवर मेट्रो ताशी ८० किलोमीटर या कमाल वेगाने धावू शकणार आहे. सर्व वैधानिक तपासण्या, चाचण्या आणि सुरक्षा मानकांची पूर्तता झाल्यानंतरच ही मंजुरी देण्यात आली आहे. सुमारे १३ किलोमीटर लांबीचा हा दुहेरी मार्ग ७५० व्होल्ट डीसी थर्ड रेल ट्रॅक्शन प्रणालीवर कार्यरत राहणार आहे.**

### सुरक्षा आयुक्तांकडून तपासणी

**» मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी ५ ते ८ जुलै या कालावधीत पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या मार्गाची सखोल पाहणी केली होती. प्राथमिक तपासणी आणि त्यानंतरच्या आढाव्यादरम्यान सुरक्षा आयुक्तांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांवरील पूर्तता अहवाल कंपनीने सादर केला. प्रत्यक्ष मंजुरी देण्यापूर्वी या मार्गावर मेट्रोची निश्चिती चाचणी यशस्वीरीत्या पार पडली.**

# पुण्यात सायलेन्सरचा 'आवाज' काढणाऱ्या 274 दुचाकीस्वारांवर कारवाई

## गेल्या काही वर्षांपासून फेरफार केलेले सायलेन्सर बुलेटला बसविण्याचे प्रकार वाढले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

रात्री-अपरात्री फटाक्यासारखा आवाज काढणारे बुलेटचालक, कर्णकर्कश हॉर्नचा वापर करणाऱ्या दुचाकीचालकांविरुद्ध पोलिसांनी कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. सायलेन्सरमध्ये फेरफार (मॉडिफिकेशन) करणाऱ्या २७४ दुचाकीचालकांविरुद्ध कारवाई केली. त्यांच्याकडून पावणेतीन लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

गेल्या काही वर्षांपासून फेरफार केलेले सायलेन्सर बुलेटला बसविण्याचे प्रकार वाढले आहेत. अशा प्रकारच्या सायलेन्सरमधून फटाक्यांसारखा आवाज येतो. दुचाकीस्वार कणकर्कश हॉर्नचा वापर करतात. रात्री-अपरात्री उपनगरात फटाक्यांसारखा आवाज काढत बुलेटचालक जातात. अशा प्रकारच्या आवाजांमुळे नागरिकांना विशेषत: ज्येष्ठ नागरिकांना त्रास होतो. याबाबत नागरिकांनी वेळोवेळी पोलिसांकडे तक्रारी केल्या होत्या. सायलेन्सरमधून फटाक्यासारखा आवाज काढणारे बुलेटचालक, तसेच कर्णकर्कश हॉर्नचा वापर करणाऱ्या दुचाकीस्वारांविरुद्ध पोलिसांनी कारवाईचा इशारा दिला आहे. दुचाकीस्वार, बुलेटचालकांना फटाक्यासारखा आवाज काढणारे सायलेन्सर बसवून देणाऱ्या गॅरेजचालकांविरुद्ध पोलिसांनी कडक भूमिका घेतली आहे.

सायलेन्सरमध्ये बेकायदा फेरफार करणारे दुचाकीचालक आणि गॅरेजचालकांविरुद्ध 'ऑपरेशन मॉडिफिकेशन' ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. शहरातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ही कारवाई सुरू करण्यात आली आहे. गेल्या तीन दिवसात २७४ दुचाकीस्वारांविरुद्ध कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख ७४ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. वाहतूक शाखेचे पोलीस आयुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.




### ८४ सायलेन्सर जप्त

**» 'वाहतूक पोलिसांनी फटाक्यासारखा आवाज काढणाऱ्या दुचाकीचालकांचे सायलेन्सर काढून ते जप्त केले आहेत. पोलिसांनी ८४ सायलेन्सर जप्त केले आहेत. यापुढील काळात फटाक्यासारखा आवाज काढणाऱ्या सायलेन्सरचा वापर करणाऱ्या दुचाकीचालकांविरुद्ध कडक कारवाई करण्यात येणार आहे. ही मोहीम यापुढील काळात सुरू राहणार आहे. दुचाकीस्वारांना वाहतूक नियमांचे पालन करावे', असे आवाहन पोलीस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी केले आहे.**